# <u>परिपत्रक</u>

मा. महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण, उच्च न्यायालय, मुंबई यांचे आदेशानुसार एप्रिल २०२६ ते मार्च २०२९ या कालावधीकरीता जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, सोलापूर मार्फत मोफत व सक्षम विधी सेवा पुरविणेकामी पॅनल विधीज्ञांची नेमणूक करावयाची प्रक्रिया सुरू करण्यात आलेली आहे.

ज्या विधिज्ञांचा वकीली व्यवसाय ०३ वर्षापेक्षा कमी नाही व ज्या विधिज्ञांवर फौजदारी खटला प्रलंबित नाही असे विधीज्ञ हे पॅनल विधिज्ञ म्हणून नेमणुकीसाठी अर्ज करणेस पात्र आहेत.

इच्छुक विधीज्ञांनी आपला अर्ज सोबत जोडलेल्या अर्जाच्या नमुन्यामध्ये भरून जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, सोलापूर या कार्यालयाकडे सादर करावा.

अर्ज **<u>दि. २७/०२/२०२६ रोजी सायंकाळी ०५.०० वाजेपर्यंत</u>** या कार्यालयास प्राप्त होतील याची दक्षता घ्यावी. त्यानंतर आलेल्या अर्जाचा विचार केला जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

सचिव,
जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, सोलापूर

दि. १३/०२/२०२६
जि. वि. से. प्रा. सोलापूर

सोबत:— अर्जाचा नमुना

.....................................................................................................

जा. क्र. ३०५/२०२६
जिल्हा विधी सेवा प्राधिकरण,
सोलापूर दि. १३/०२/२०२६

**<u>प्रत माहितीसाठी व नोटीस बोर्डावर प्रसिध्द करून अहवाल देणेकरिता</u>**

१. मा. अध्यक्ष, बार असोशिएशन, सोलापूर, यांना विनंती करण्यात येते की, सदरचे परिपत्रक सर्व विधीज्ञांच्या निदर्शनास आणावे व एक प्रत विधीज्ञ संघटनेचे नोटीस बोर्डावर प्रसिध्द करावी.
२. सहा. अधीक्षक, अर्थ व वित्त विभाग, जिल्हा न्यायालय, सोलापूर
३. सहा. अधीक्षक, अर्थ व वित्त विभाग, दि. न्या.व. स्तर, सोलापूर
४. सहा. अधीक्षक, अर्थ व वित्त विभाग, मुख्य न्यायदडाधिकारी कोर्ट नं.१, सोलापूर
५. प्रबंधक/अधिक्षक/सहा. अधिक्षक, कौटुंबिक न्यायालय/औदयोगिक न्यायालय/कामगार न्यायालय/सहकार न्यायालय/धर्मादाय आयुक्त कार्यालय/शाळा न्यायाधीकरण/जिल्हा ग्राहक मंच, सोलापूर

( अ.क्र. २ ते ५ यांना विनंती करण्यात येते की, सदरचे परिपत्रक हे आपल्या कार्यालयीन नोटीस बोर्डावर प्रसिध्द करावे.)

अधीक्षक,
जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, सोलापूर

# अर्जाचा नमुना

प्रति,

मा. अध्यक्ष,
जिल्हा विधी सेवा प्राधिकरण,
सोलापूर

विषय : पॅनल ॲडव्होकेट म्हणून नेमणूक करणेबाबत.

मा. महोदय,

मी पॅनल विधिज्ञ म्हणून काम करणेस इच्छुक आहे. माझे ३ वर्षापेक्षा जास्त वकीली व्यवसायामध्ये अनुभव आहे. माझी पॅनल विधिज्ञ म्हणून नेमणूक होणेकामी माहिती खालीलप्रमाणे सादर करीत आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| माझे संपूर्ण नाव | | | |
| लिंग * | पुरूष / स्त्री / इतर | वर्ग *(आपला उचित वर्ग निवडावा.) | SC/ST/OBC/ VJNT/SBC/SBEC /GENERAL |
| संपूर्ण पत्ता | | | |
| शारीरीकरित्या दिव्यांग * | होय / नाही | विधिज्ञ सनद क्रमांक व दिनांक | |
| मोबाईल क्र. | | ई—मेल आयडी | |
| न्यायालयीन कामकाज करणेकरिता आवडते कोणतेही एक क्षेत्र * | | दिवाणी / फौजदारी / बाल न्यायमंडळ / कौटुंबिक / कामगार न्यायालय / औदयोगिक न्यायालय | |

* आपणास लागू नसलेली माहिती खोडावी.
**#** आपण नमुद केलेल्या प्रकारामध्ये न्यायालयीन कामकाज करण्याचा अनुभव असलेबाबत अर्जासोबत अध्यक्ष, बार असोसिएशन यांचे शिफारस पत्र दाखल करावे.

माझेवर कोणताही फौजदारी खटला दाखल / प्रलंबित नाही. माझी पॅनल विधिज्ञ म्हणून नेमणूक झालेस मी पक्षकारांकडून कामासाठी मोबदल्याची मागणी करणार नाही व तसेच मला दिलेल्या प्रकरणामधील दर आठवडयाची न्यायालयीन सदयस्थिती जिल्हा विधी सेवा प्राधिकरण यांचेकडे नोंदवहीमध्ये न चुकता नोंदविण्याची हमी देत आहे. तसेच, मी मा. राष्ट्रीय विधी सेवा प्राधिकरण, नवी दिल्ली (मोफत व सक्षम विधी सेवा) नियम, २०१० मधील अटी व नियमांचे व जिल्हा विधी सेवा प्राधिकरणांचे सूचना / आदेशांचे पालन करण्यास तयार आहे.

तरी माझी पॅनल विधिज्ञ म्हणून नेमणूक करण्यात यावी ही विनंती.

दिनांक :
ठिकाण :

अर्जदाराची सही

नाव.........................................